# डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न २०१३

## प्रवरा इन्स्टिटयूट ऑफ रिसर्च ॲन्ड एज्युकेशन इन नॅचरल ॲन्ड सोशल सायन्सेस (पायरेन्स) लोणी, ता.राहता, जि. अहमदनगर







### अध्यक्ष

१

**श्री. मुरलीधर म्हाळू पुलाटे**

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न २०१३

- सन १९८३ मध्ये सेवाभावी संस्था म्हणून स्थापना, संस्थेकडील जमिनीचे एकूण क्षेत्र २४ हेक्टर.
- रेनवॉटर हॉर्वेस्टींग स्ट्रक्चर केलेले असून दोन शेततळयांमध्ये सुमारे दोन कोटी लिटर साठवण क्षमता.
- किफायतशीर पाणी वापरासाठी तुषार व ठिबक सिंचन पध्दतीचा अवलंब.
- शेळीपालन, कुक्कटपालन व दुग्धोत्पादन यासारख्या अनेक विविध क्षेत्रामध्ये प्रशिक्षण कार्यक्रम घेतल्यामुळे ग्रामीण परिसरातील युवकांना रोजगार.
- संस्थेमार्फत ५६१ स्वयंसहाय्यता बचत गट, १५३ फार्मर्स क्लब, २१७ पिकनिहाय गटांची स्थापना .
- उत्पादित केलेल्या मालाच्या विक्रीसाठी वसुंधरा या नावांने मार्केट ब्रँड विकसित.
- राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट कृषि विज्ञान केंद्र पुरस्काराने गौरवित.

# डॉ.पंजाबराव देशमुख कृषिरत्न २०१३

## श्री.अनिल घमाजी मेहेर

### मु.वारुळवाडी, पो.नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे



- पुणे जिल्हयातील प्रगतशील कृषि पदवीधर शेतकरी.
- तालुक्यात सर्वप्रथम द्राक्ष लागवड करुन द्राक्षांच्या अनेक जातींचा तौलनिक अभ्यास केला व सिडलेस सिलेक्शन-१, सिलेक्शन-२ व मोनिका हे तीन वाण विकसीत केले.
- द्राक्ष उत्पादक शेतक-यांना संघटित करुन विघ्नहर द्राक्ष उत्पादक सहकारी संस्थेची स्थापना.
- सामुहिक शेतीच्या माध्यमातून परिसरातील शेतक-यांना शेडनेड आणि पॉलिहाऊसमध्ये जरबेरा, कार्नेशियन, काकडी, ढोबळी मिरची इत्यादी पिकांचे विक्रमी उत्पादन घेण्यासाठी मार्गदर्शन.

२

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न २०१३

- काढणीपश्चात तंत्रज्ञानाविषयी माहिती देऊन ग्रेडिंग, पॅकेजिंग, हँडलिंग व मार्केटिंगविषयी शेतक-यांना मार्गदर्शन.
- परिसरातील केळी उत्पादक शेतक-यांना चांगला भाव मिळवून देण्याच्या दृष्टीने व केळी पिकाखालील क्षेत्राची वाढ करण्याच्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत रायपनिंग चेंबर्सची उभारणी.
- कृषि शिक्षणाद्वारे रोजगार निर्मिती व्हावी यासाठी तालुक्यामध्ये सर्वप्रथम महात्मा फुले कृषि विद्यापीठाशी संलग्नित कृषि विद्यालय सुरु करुन भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत कृषि विज्ञान केंद्राची स्थापना.
- अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, नेदरलँड, दुबई, साऊथ आफ्रिका इ. देशांना अभ्यासदौ-याच्या माध्यमातून भेटी देवून तेथील तंत्रज्ञान आत्मसात केले.
- आदिवासी समाजाला एकत्र आणून ठाकरवाडी येथे प्राथमिक शाळा सुरु.
- उत्कृष्ट द्राक्ष उत्पादक शेतकरी, उत्कृष्ट निर्यातक्षम द्राक्ष उत्पादक शेतकरी, भारतीय निर्यातीमधील विशेष योगदानाबद्दल पुरस्कार, द हिंदरत्न पुरस्कार त्याचप्रमाणे कृषिभूषण पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी गौरवित.